16 DEC 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाला सात लाखांचा निधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

संतसाहित्य व अध्यात्माचे गाढे अभ्यासक सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यासाठी सात लाख रुपयांचा निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपुर्द केला. या निधितून 'स्व. सद्गुरू गुरूनाथ मुंगळे अध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार" अशी मागणी डॉ. गौरी कहाते यांनी केली. त्या अनुषंगाने लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

डॉ. कहाते म्हणाल्या, माझे वडील स्व. सद्गुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे हे इंग्रजी आणि संस्कृत या दोन्ही विषयांतीलतज्ज्ञ होते. सन १९९९ पर्यंत त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. त्यासोबतच संतसाहित्य, अध्यात्म यांचा अभ्यास व लेखन केले. त्यातून त्यांनी लिहीलेली १५ पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांनी त्यांच्या अध्यात्मिक प्रवासाबद्दल व्यक्त केलेले मनोगत येत्या २५ डिसेंबर रोजी कोल्हापूर येथे प्रकाशित करण्यात येत आहे.

डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने (मुंबई) त्यांना डी. लिट. मानद पदवी प्रदान केली. त्याचप्रमाणे त्यांना कोल्हापूर भूषण, पुणे भूषण, ऋग्वेद भूषण इत्यादी पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात आले आहे. ६ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शिवाजी विद्यापीठामार्फत 'अध्यात्मिक तत्वज्ञान साहित्य पुरस्कार" देण्यात यावा, असा आमचा मानस असून त्यासाठी रुपये सात लाख इतका निधी ठेव स्वरुपात विद्यापीठाकडे सुपूर्द करीत आहोत. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या वतीने सदर निधीच्या धनादेशाचा स्वीकार केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजय देशपांडे उपस्थित होते.



कोल्हापूर : सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सात लाखाचा निधी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपुर्द करताना मुंगळे कुटुंबिय.

- **डॉ. गुरुनाथ मुंगळे स्मृतिप्रित्यर्थ उपक्रम :**
- **अध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार सुरू करावा:**
- **डॉ. गौरी कहाते यांचे आवाहन**

महासत्ता

# 'स्कील' सर्वच घटकांसाठी मार्गदर्शक ठरेल-डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. १४ (प्रतिनिधी)-

........................

कौशल्य निर्मिती आणि विकास या क्षेत्रांमध्ये डॉ. आण्णासाहेब गुरव प्रभावी कामगिरी बजावत आहेत. त्यांच्या अनुभवातून निर्माण झालेले स्कील' पुस्तक निश्चितपणाने सर्वच घटकांसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील प्राध्यापक आणि कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. आण्णासाहेब गुरव आणि प्राचार्य डॉ. आर.एस. साळुंखे यांनी लिहिलेल्या स्कील' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सभागृहात करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी आभार मानले. कार्यक्रमास अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी.डी. राऊत, डॉ. केदार मारुलकर आदी उपस्थित होते.

महासत्ता

# शिक्षणतज्ज्ञांनी एकत्र येऊन देशासाठी योगदान द्यावे- डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता.१४(प्रतिनिधी)-

शिक्षणतज्ज्ञांनी एकमेकांशी स्पर्धा करण्यापेक्षा एकत्र येऊन देशासाठी आपले योगदान दिले पाहिजे असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित सात दिवसांच्या स्तुती कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी डॉ. शिंदे बोलत होते. शिवाजी विद्यापीठातील सैफ डी एस टी - सी एफ सी विभागात आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अतिथी म्हणून प्रा. एस. एच. ठकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डी. वाय. पाटील, तळसदे येथील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. के. प्रतापन यांनी उपस्थिती दर्शविली. सात दिवस या व्याख्यानमालेतून दिल्ली, बेंगलोर, मुंबई अशा प्रकारे देशातील विविध भागातून १४ तज्ज्ञांची व्याख्याने झाली. या कार्यशाळेसाठी स्तुति टीम मध्ये असणारे डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, डॉ. मकसूद वाईकर, आदिती गर्गे, अजित कांबळे, विजया इंगळे, सुप्रिया साठे, गायत्री पवार यांना कार्यशाळा पार पाडण्यासाठी प्रा. सोनकवडे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन सत्यशीला घोंगडे आणि प्रज्ञा राजे यांनी केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

16 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषा संस्कृतीचे द्योतक : डॉ. देवराळकर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : 'भाषा अनेक संदर्भ घेऊन येत असते. भाषांतर करताना भाषांतरकाराला दोन्ही भाषांची संस्कृती माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे भाषा संस्कृतीचे द्योतक आहे,' असे प्रतिपादन अमरावतीतील शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेच्या इंग्रजी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. धनंजय देवराळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभाग आणि दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ अनुदान; आयोग नवी दिल्ली यांचा उपक्रम 'भारतीय भाषा उत्सव'अंतर्गत भाषांतराचे सांस्कृतिक महत्त्व ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. मराठी विभागप्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

डॉ. देवराळकर म्हणाले, 'इतर भाषा समजून घेण्यासाठी ती भाषा येणे व तेथील संस्कृती माहिती असणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे भाषांतरामध्ये रोजगाराच्या संधी आहेत. नव्या शैक्षणिक धोरणानुसार स्थानिक भाषेला महत्व दिले आहे. त्यामुळे मराठी भाषा ज्ञानभाषा झाली पाहिजे.' समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सहा. प्राध्यापक पी. एस. कांबळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. लोंढे यांनी केले, डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

1 6 DEC 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘लोकसत्ता लोकांकिका’चा बहुमान कोणाला ?

सॉफ्ट कॉर्नर
presents
लोकसत्ता लोकांकिका
in association with
ZEE युवा
Togethering

अखंड मेहनतीनंतरचा तो सोनेरी क्षण अनुभवण्याची वेळ समीप येऊन ठेपली आहे. ‘लोकसत्ता लोकांकिका’ या बहुप्रतिष्ठित आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेसाठी आपापल्या विभागातील प्राथमिक फेरीच्या माध्यमातून नाट्यवेड्या तरुण शिलेदारांनी आपला प्रवेश निश्चित केला होता. प्राथमिक फेरी आणि नंतर विभागीय अंतिम फेरीचे आवाहन यशस्वीरीत्या पूर्ण करून आठ केंद्रांच्या प्रत्येकी एक अशा आठ एकांकिका आता ‘लोकसत्ता लोकांकिका’च्या महाअंतिम फेरीत दाखल झाल्या आहेत. दमदार संहिता, सकस आशय, प्रकाशयोजना-नेपथ्यातील नावीन्यपूर्ण प्रयोग, तावूनसुलाखून केलेल्या तालमी, परीक्षकांचे मार्गदर्शन या सगळ्याचा अर्क आता महाअंतिम फेरीत सादर होणाऱ्या प्रयोगात उतरणार आहे. ‘लोकसत्ता लोकांकिका’चा बहुमान मिळवण्यासाठी आपापल्या शहराचे, महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्पर्धक चमूसाठी आता कसोटीचा खरा क्षण समोर येऊन ठेपला आहे. ‘लोकसत्ता लोकांकिका’ या नाट्यवर्तुळात अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा महाअंतिम सोहळा मुंबईत शनिवारी, १७ डिसेंबरला प्रभादेवीतील रवींद्र नाट्यमंदिर येथे रंगणार आहे. या महाअंतिम सोहळ्यात ‘लोकसत्ता लोकांकिका’चा बहुमान मिळवणाऱ्या महाविद्यालयाला रंगभूमी आणि चित्रपटसृष्टी गाजवणारे प्रसिध्द अभिनेते परेश रावल यांच्या उपस्थितीत पुरस्कार स्वीकारण्याची आणि त्यांचे विचार ऐकण्याची संधी मिळणार आहे

**प्रायोजक :** लोकसत्ता आयोजित ‘सॉफ्ट कॉर्नर’ प्रस्तुत ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धा सहप्रायोजक ‘झी युवा’ आणि ‘टुगेदरिंग’च्या सहकार्याने पार पडणार आहे. ही स्पर्धा पॉवर्ड बाय ‘इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड’, ‘केसरी टूर्स’ आणि ‘मे. बी. जी. चितळे डेअरी’तर्फे आहे. साहाय्य ‘अस्तित्व’ चे आहे. लोकांकिकेच्या मंचावरील कलाकारांच्या कलागुणांना चित्रपट, मालिकेत संधी देणारे ‘आयरिस प्रॉडक्शन’ टॅलेंट पार्टनर आहेत.

**महाअंतिम सोहळा ...**

■ कधी : १७ डिसेंबर ■ कुठे : रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी
■ वेळ : सकाळी १०.०० वाजता

कोल्हापूर विभाग

## विषाद

डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत ‘विषाद’ या एकांकिकेचे अधिक सकस, आशयघन सादरीकरण व्हावे यासाठी शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे रंगकर्मी अंतिम सराव करत आहेत. परीक्षकांनी सुचवलेल्या काही मुद्द्यांचे अवलोकन करून आवश्यक तो बदल केला जातो आहे. एकीकडे महाविद्यालयीन परीक्षेची तयारी आणि दुसरीकडे महाअंतिम फेरीतील तयारीची परीक्षा अशी एकाच वेळी दुहेरी कसरत त्यांना करावी लागते आहे. तरीही मनापासून प्रेम असलेल्या नाट्यकलेवर, एकांकिकेवर या कलाकारांचा अधिक भर असल्याचे त्यांच्या बोलण्यातून जाणवले. ‘विषाद’चे दिग्दर्शन पार्थ घोरपडे, क्षितिजा गुरव यांनी केले आहे. महाभारतात पंडू राजाला नियोग प्रक्रियेतून अपत्य प्राप्त झाली. ही नियोग संस्कृती आजच्या काळात लागू झाली तर त्याचे काय पडसाद उमटू शकतील यावर भाष्य करणारी ही एकांकिका. प्राथमिक व विभागीय अंतिम स्पर्धेनंतर परीक्षकांनी सूचित केलेल्या संगीत, नेपथ्यातील किरकोळ तांत्रिक दोष बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कथा मित्त समाजातील असल्याने त्या अनुषंगाने काही प्रतीकात्मक नेपथ्य वापरण्यावर भर दिला जात आहे, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

सकाळ



कोल्हापूर : न्यू कॉलेजमधील कार्यशाळेत बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर.

# नवे शैक्षणिक धोरण मन, मेंदू, मनगट सामर्थ्यवान बनविणारे

## डॉ. बी. एम. हिर्डेकर; विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १५ : "स्वातंत्र्यानंतरच्या एकांगी इंग्रजी शिक्षणाने मन, मेंदूचा विकास झाला नाही. जगाशी स्पर्धा करण्याची क्षमता सिद्ध करणारे आणि मन, मेंदू आणि मनगट सामर्थ्यवान घडविणारे समाज क्रांतिकारी नवे शैक्षणिक धोरण आहे. त्याची प्रवाभीपणे अंमलबजावणी व्हावी," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेच्या डीआरके कॉलेज क्लस्टरअंतर्गत 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०'वर एकदिवसीय कार्यशाळा झाली. न्यू कॉलेज इतिहास विभाग आणि राज्यशास्त्र विभागातर्फे नियोजन केले.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, "शिक्षण मोठी गुंतवणूक आहे. शिकणे चैन आहे. प्रयत्नपूर्वक हमखास परतावा भरपूर मिळवून देणारी शिक्षण ही प्रक्रिया आहे. भेजे को टेन्शन देने का नही, हे आजच्या तरुणांचे ब्रीद आहे. ते बदलून भेजे को टेन्शन देने के सिवा कुछ मिलेगा नही, हे लक्षात ठेवावे." डॉ. बी. पी. चव्हाण यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील अध्यक्षस्थानी होते. दुसऱ्या सत्रात डॉ. एम. एम. कारंजकर आणि तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. ए. एम. शेख यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा समन्वयक डॉ. आर. एस. जाधव यांनी आभार मानले.

1 6 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्जुनीमध्ये श्रमदानातून साकारला बंधारा


## 'एनएसएस'चा पुढाकार; पाच गटांत ५० जणांसह ग्रामपंचायतीचाही सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

नानीबाई चिखली, ता. १५ : पहाटे लवकर उठायचे, तासात आवरायचे, चहा-नाश्ता घ्यायचा. नंतर फावडे, कुदळ, पाटी घेत चार ते पाच तास काम करायचे. राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरार्थिनींनी सात दिवसांत श्रमदानातून विधायकतेचा जणू बंधाराच साकारला.

कागल तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेलं अर्जुनी शेवटचे गाव. याच गावात 'पाणी आडवा पाणी जिरवा' 'मोलाचे जीवन वाचवूया' या उद्देशाने देवचंद कॉलेजच्या (कनिष्ठ विभाग) राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. शिबिरात २५ मुले, २५ मुली असे ५० स्वयंसेवक सावित्रीबाई फुले, रायगड, स्वराज्य, शिवभीम, पावनखिंड या पाच ग्रुपमध्ये विभागलेले. नेहमीच अवर्षणग्रस्त गावात जलसंधारणाची गरज ओळखत पंत मंदिरानजीक ओढ्यावर बंधारा घालण्याची सूचना शिबिरार्थींना केली होती. शिबिरार्थींनी दररोज चार-पाच तास हसत-खेळत, गाणी म्हणत श्रमदान केले. जोडीला ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे दोनशे फूट लांब, आठ फूट उंच बंधारा त्यांनी आकारास आणला. यासाठी प्रकल्प अधिकारी राहुल घटेकरी, बी. एस. कुंभार, राणी सोकावणे, अर्चना पाटील यांचे नियोजन, सरपंच वर्षा सुतार, उपसरपंच सुनील देसाई, सदस्य सुदाम देसाई यांच्या मार्गदर्शनामुळे बंधारा कमी कालावधीत पूर्ण झाला.

> **शिबिरार्थिंनी जलबंधारा बांधण्याचा राबवलेला उपक्रम स्तुत्य आहे. शिबिरार्थीच नव्हे तर ग्रामस्थांच्या चिरकाल स्मरणात राहील, असेच काम सात दिवसांत श्रमदानाने केले आहे.**
> **- वर्षा सुतार,**
> सरपंच, ग्रामपंचायत अर्जुनी



**अर्जुनी : येथे बंधारा साकारताना 'देवचंद'चे शिबिरार्थी.**

### बंधाऱ्याचे महत्त्व

अलीकडे पाणीसाठी कमी होऊन पाणीटंचाई निर्माण होत आहे. यासाठी भूपृष्ठावरून उताराच्या दिशेने वाहत जाणाऱ्या पाण्याचा वेग कमी होऊन जास्तीत जास्त पाणी जमिनीमध्ये मुरविण्यासाठी बंधारे फायदेशीर ठरतात. पाळीव प्राणी, पशुपक्षी, वन्यजीवांची तहान भागविण्यासाठी फायदा होईलच, शिवाय भूजलपातळी वाढण्यास बंधारे संजीवनी ठरतात.

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# एमबीए विभागात ७१ जणांचे रक्तदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए. विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ७१ जणांनी रक्तदान केले. हे रक्तदान शिबिर विद्यापीठातील वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व सांगत शरीरावर होणाऱ्या चांगल्या परिणामाची माहिती दिली. तसेच या रक्तदानामुळे कोणाचे तरी प्राण वाचतात, त्यामुळे रक्तदान हे जीवनदान असल्याचे सांगितले. सीपीआर रुग्णालयातील रक्तपेढी वैद्यकीय अधिकारी डॉ. आसमा मुल्ला यांनी रक्तदान करताना घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. डॉ. ए. एम. गुरव, यांच्या मार्गदर्शनाखाली एम. बी. ए.च्या विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. प्रास्ताविक डॉ. दीपा इंगवले यांनी केले. डॉ. रामदास बोलके यांनी आभार मानले. यावेळी विविध मान्यवर, विद्यार्थी उपस्थित होते.